REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख २८ जून, १९५० | अंक २६

## वांठिया बँक लिमिटेड

हेड ऑफिस—पनवेल, जि. कुलाबा.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | ४,७७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. | ४७,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ५०,००,००० |

शाखा

मुंबई:—६५।६७ झव्हेरी बझार. | पुणें:—१२६८ भवानी पेठ.
अहमदनगर:—बझार पेठ. | बेलापूररोड:—पोस्टासमोर,
कल्याण:—शिवाजी चौक. | भिवंडी:—बझार पेठ.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्रीमंत शेट रतनचंद भिकमदास बांठिया, अध्यक्ष.

" " केशरचंद आनंदराम बांठिया.
" " खिवराज आनंदराम बांठिया.
" " बिरदीचंद भूरचंद बांठिया.
" " चुनिलाल जसरूप मुनोथ.
" " रवजी भिमजी रंगपरिया. (ऑ. मॅजिस्ट्रेट.)
*श्रीमंत गंगाधर विष्णू ऊर्फ नानासाहेब पुराणिक.
श्री. रा. केशव गोविंद लिमये बी. ए. एलएल्. बी. वकील, पनवेल.
" जे. एस. कासट बी. कॉम.
" एस. आर. घासवाला
" ताराचंद दगडूराम भंडारी कापडाचे व्यापारी, अहमदनगर.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

*विशेष माहितीसाठीं मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.*

जी. बी. साठे, जनरल मॅनेजर.

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

*—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१६,८१५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७१,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल्. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.


## विविध माहिती

**उंदरांपासून अन्नधान्याचा बचाव**—संयुक्त प्रांतांत ऑक्टोबर १९४९ ते फेब्रुआरी १९५० पर्यंत शेतांतील उंदरांचा नाश करण्याची मोहीम हातीं घेण्यांत आली होती. एकूण १५,७८,००० एकरांत हें कार्य करण्यांत येत होतें. ह्या मोहिमेमुळें २८,००० टन अन्नधान्य उंदरांपासून बचावलें असें समजतें.

**दिल्लीची लोकसंख्या**—दिल्लीमधील शिधा अधिकाऱ्यांनीं खोटीं रेशन कार्डें शोधून काढल्यामुळें दिल्लीची लोकसंख्या ४,१२,००० नें कमी झाली आहे. शिधापत्रकांच्या संख्येप्रमाणें दिल्लीची लोकसंख्या १६,४२,००० होती; ती आतां १२,३०,००० झाली आहे. खोटीं रेशनकार्डें सांपडल्यामुळें दर आठवड्यास ११,००० मण धान्य कमी लागणार आहे.

**हिन्दींतून तारा पाठविण्याची सोय नापसंत ?**—उत्तर प्रदेशांतील कांहीं शहरांच्या दरम्यान हिंदींतून तारा पाठविण्याची सोय करण्यांत आली होती. परंतु ह्या सोयीचा फायदा फार थोड्या लोकांनीं घेतला असें आढळून आलें आहे. कानपूरला रोज ४,००० तारा धाडण्यांत येतात. त्यांपैकीं सुमारें २० तारा हिंदींतून करण्यांत येतात.

**५३ दिवसांचें उपोषण**—दिल्ली स्पिट्झ् ह्या जर्मनानें ५३ दिवसांचें आपलें उपोषण नुकतेंच संपविलें. उपोषणामुळें त्याचें वजन ६६ पौंडांनीं कमी झालें. आतां खास आहार घेऊन प्रकृति सुधारण्यासाठीं तो एका इस्पितळांत रवाना झाला आहे. उपोषणाच्या मुदतींत त्यानें २,६०० सिगारेट्स् ओढल्या व फक्त सोडा वॉटर घेतलें.

**पोट कुणाला सुटलें आहे ?**—जम्मू जवळील एका गांवीं एक नाग आणि चार मांजरें ह्यांची लढाई होऊन अखेर नाग आणि दोन मांजरें मृत्युमुखीं पडलीं. हीं चार मांजरें एका उंदराच्या पाळतीवर असतांना नागोबांनीं मध्येंच उंदराला पकडला. त्याबरोबर चारही मांजरांनीं नागावर हल्ला केला.

**कच्च्या रेशमाची आयात**—बाजारांत असलेल्या कच्च्या रेशमाचा तुटवडा लक्षांत घेऊन मद्रास सरकारनें १५,००० पौंड कच्चें रेशीम इटलीहून आयात करण्याचें ठरविलें आहे. त्या शिवाय हाँगकाँगमधील व्यापारी कंपन्यांकडूनही २० हजार पौंड रेशीम मिळविण्याची खटपट चालू आहे.

**तांदुळाच्या शिध्यांत कपात**—मद्रास सरकारनें नागरिकांच्या शिध्यापैकीं तांदुळांत रोजीं १ औंसाची कपात करण्याचें ठरविलें आहे. ता. १ जुलै पासून ८ औंस तांदुळाऐवजीं ७ औंस तांदूळ दिला जाईल. तांदुळाऐवजीं १ औंस जादा गहूं दिला जाईल.

**स्वित्झर्लंडला युद्धाची भीति ?**—युरोपमध्यें युद्ध सुरू झाल्यास अन्नधान्याची आयात थांबेल. म्हणून प्रत्येक स्विस कुटुंबानें आपल्या घरांत ७ पौंड साखर, ४ पौंड तेल, १२ पौंड तांदुळ, पीठ अगर इतर धान्य ह्यांचा साठा ठेवावा असा हुकूम स्विट्झरलंडच्या सरकारनें काढला आहे.

**सावंतवाडी स्टेट बँकेचें प्रांतिक सहकारी बँकेंत विलिनीकरण**—सावंतवाडी स्टेट बँकेचा व्यवहार मुंबई प्रांतिक सहकारी बँकेनें स्वतःकडे घेण्यास मुंबई सरकारनें संमति दिली आहे. सरकार आणि प्रांतिक सहकारी बँक ह्यांचेमधील करार पुरा झाला, म्हणजे हा व्यवहार वर्ग होईल.


# — वार्षिक सिंहावलोकन —

सह्याद्रि देशास संपत्ति देते. वेस्टर्न इंडिया लोकांस सुखी करते.

१९४५ पासून हप्त्यांत बिलकूल वाढ नाहीं. नवीन कामांत सालोसाल वाढ.

१९४९ मध्यें सुद्धां नवीन काम रुपये १,४५,००,०००

—पहिल्या प्रतीचे भरपूर बोनस—

हयातींतील द. सा. द. ह. रुपये ८ | हयातीनंतर द. सा. द. ह. रुपये १०

आमचे प्रतिनिधी म्हणतात "वेस्टर्नच्या कामामुळें जीवनांत आनंद वाटतो."

आजच लिहा अगर भेटा—

पुणें शाखाः—१७१ बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, बेलबाग चौक, पुणें २. फोन नं. ३४०१

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए. मॅनेजर.

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., सातारा.

# अर्थ

बुधवार, ता. २८ जून, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चित्रपटाच्या धंद्यासाठी फिनॅन्स कॉर्पोरेशन

हिंदी चित्रपटाच्या धंद्यांत सुमारें १ लक्ष लोक गुंतलेले असून ४० कोटी रुपयांचें भांडवल त्यांत अडकविण्यांत आलेलें आहे. सुमारे ७०० उत्पादक कंपन्या आणि १५ लक्ष लोकांची बसण्याची सोय असलेली ३,००० सिनेमागृहें, असा त्याचा व्याप आहे. चित्रपटाच्या निर्मितीसाठी भरमसाट व्याजानें पैसा उभारला जातो आणि चित्रपट काढणें म्हणजे एक सोडतीचा व्यवहार होऊन बसतो. चित्रपटाचा धंदा सुनियंत्रित नाहीं. फिल्मसविषयक समाजाचा विक्षित दृष्टिकोन, सरकारचें प्रतिकूल धोरण, सेन्सॉरचे निर्बंध, अन्याय्य कर-आकारणी, भांडवल उभारणींतील अडचणी, लायक नट-नटी व गायक यांचा तुटवडा, थिएटरांची अपुरी संख्या, महत्त्वाच्या केंद्रांत चित्रपट सुरू करण्यास येणारी अडचण, आवश्यक मालाचा अपुरा पुरवठा, इत्यादि कारणांमुळें हिंदी चित्रपट धंद्यास सध्यांची दुःस्थिति प्राप्त झाली आहे, असें ह्या धंद्यांतील तज्ज्ञांचें म्हणणें आहे. हिंदी सरकारनें नेमलेल्या फिल्म्स चौकशी कमिटीचें काम चालू आहे, तिच्या पुढें साक्ष देतांना भारतांत फिल्म फिनॅन्सिंग कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत यावी, अशी इंडियन मोशन पिक्चर प्रोड्यूसर्स असोसिएशनच्या अध्यक्षांनीं मागणी केली. अशा प्रकारची कॉर्पोरेशन भांडवल पुरवूं शकली तरी इतर अनेक बाबतींत सुधारणा घडवून आणणें ह्या धंद्यांतील लोकांच्या कार्यक्षमतेवरच अवलंबून रहाणार, हें उघड आहे. ग्रेट ब्रिटनमधील कॉर्पोरेशनच्या व्यवहारपद्धतीची माहिती येथें दिली असतां उद्बोधक होईल.

दोन वर्षांपूर्वी ग्रेटब्रिटनमधील चित्रपटांचें उत्पादन घटलें होतें, त्यांतील तंत्रज्ञांत बेकारी माजली होती आणि निर्मात्यांचा उत्पादनखर्च भागण्याइतकेंहि उत्पन्न त्यांना मिळत नसे. १९४८ मध्यें, चित्रपटाच्या धंद्यास सरकारी मदत करण्याची योजना बोर्ड ऑफ ट्रेडच्या अध्यक्षांनीं जाहीर केली आणि १९४९ च्या प्रारंभीं नॅशनल फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशनची पार्लमेंटच्या खास कायद्यानें स्थापना केली. ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनचे पहिले प्रमुख, लॉर्ड रीथ ह्यांची चेअरमनचे जागीं निवड करण्यांत आली. नॅ. फि. फिनॅन्स कॉर्पोरेशनचा पहिला अहवाल आतां प्रसिद्ध झाला आहे.

ब्रिटिश तिजोरींतून कॉर्पोरेशनला ५० लक्ष पौंड मिळाले आणि तिनें किफायतशीर चित्रपटांच्या निर्मितीस सहाय्य करण्यास तात्काळ प्रारंभ केला. "पैसे थोडे धोक्यांत आले, तरी चित्रपट-निर्मितीस बाध येतां कामा नये" ह्या धोरणानें कॉर्पोरेशननें व्यवहार केला. कॉर्पोरेशनच्या मदतीनें एकूण ६३ चित्रपट तयार झाले किंवा तयार होत आहेत, किंवा योजिले जात आहेत. एकूण २६१ अर्जदारांच्या अर्जांचा कॉर्पोरेशननें विचार केला, त्यावरून उत्पादकांना मदतीची किती गरज होती हें लक्षांत येईल.

आपल्या चित्रपटाच्या प्रकाशनाचा करार पुरा करूनच बहुधा निर्माता कॉर्पोरेशनकडे कर्जासाठी जातो. अशा कराराचे आधारावर बँक उत्पादन खर्चाच्या ७५% पर्यंत कर्ज बहुधा देते. उत्पादकाची योजना कॉर्पोरेशनला पसंत पडली, तर बाकीची रक्कम ( उत्पादकानें स्वतः घातलेली रक्कम वगळून ) कॉर्पोरेशन देतें. उत्पादकाची गुंतवणूक ही प्रथम खर्च होते व सर्वांत शेवटीं त्याला परत मिळते. म्हणजे, नुकसान आलें तर उत्पादकाचा पैसा प्रथम बुडतो. अंदाजपत्रकाच्या बाहेर चित्रपटाच्या निर्मितीचा खर्च गेला, तर ह्या जादा खर्चास लागणारी रक्कम पुरविण्याची हमी घेणारे लोक अथवा संस्था ( गॅरंटॉर ) कॉर्पोरेशनच्या कर्जास आवश्यक असतात. जनतेचा पैसा ज्यांत गुंतविण्याचा, त्या चित्रपटांच्या तपशीलांत कॉर्पोरेशननें जाणें अपरिहार्यच ठरतें. चांगली गोष्ट, नट-नटी, दिग्दर्शन, इत्यादि बाबतींत मतैक्य होणें अशक्य असलें तरी एकंदरीनें पहातां, कॉर्पोरेशननें ह्या संबंधांतील आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केलेला नाहीं, असें आढळून येतें.

कॉर्पोरेशननें आतांपर्यंत ४४,३६,६९० पौंडांचीं कर्जें मंजूर केलीं आहेत. म्हणजे, मूळ भांडवलापैकीं अद्याप ६,००,००० पौंड उपलब्ध आहेत. आतां आणखी १०,००,००० पौंड ब्रिटिश तिजोरीकडून कॉर्पोरेशनला मिळाले आहेत. चित्रपट धंद्याच्या उत्पन्न-खर्चांतील तूट कॉर्पोरेशनला भरून काढतां येणार नाहीं हें उघड आहे. हा धंदा स्वतःच्या पायावरच अखेर उभा राहिला पाहिजे. परंतु उत्पादन वाढवून बेकारी कमी करणें आणि डॉलर्स मिळविण्याचा संभव निर्माण करणें एवढाच कॉर्पोरेशनचा तात्कालिक उद्देश आहे.

## रेल्वे व्यवस्थेची पुनर्घटना

भारतीय रेल्वेजच्या ३४,००० मैल लांबीच्या रेल-रस्त्यांची वाटणी सहा गटांत करण्यांत येणार आहे.

नॉर्दर्न रेल्वे मध्यें पंजाब, 'पेपसु' आणि उत्तर प्रदेशाचा बराच भाग येईल.

वेस्टर्न रेल्वे मध्यें राजस्तान, सौराष्ट्र व कच्छ हीं येतील. कांडला बंदराची योजना, वाढता व्यापार आणि लष्करी महत्त्व ह्या दृष्टीनें ह्या रेल्वेकडे विशेष लक्ष राहील.

सेंट्रल रेल्वे वहातुकीच्या मोठेपणाच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. मुंबई, सोलापूर, अहमदाबाद हीं औद्योगिक केंद्रें ह्या गटांत येतील. मुंबई बंदरहि त्यांत येईल.

सदर्न रेल्वे दक्षिण भारताच्या वहातुकीसाठीं निर्माण केली जाईल. साउथ इंडियन रेल्वे, म्हैसूर स्टेट रेल्वे आणि एम. एस. एम. रेल्वेचा बराच भाग हीं सदर्न रेल्वेंत जातील.

ईस्टर्न रेल्वे. हैद्राबाद, मध्यप्रदेश, बिहारचा कांहीं भाग, ओरिसा ( कोळशाचा प्रदेश सोडून ) ह्यांचा समावेश ह्या रेल्वेंत होईल.

नॉर्थ वेस्टर्न रेल्वे कोळसा, ताग, इत्यादींची व कलकत्ता बंदरांतील वहातुक ह्या रेल्वेस करावी लागेल. मोगलसराई, अलाहाबाद, कानपूर व लखनौपर्यंत ही रेल्वे वहातुक करील.

## बँकेंतील नवा खातेदार

### चांगली ओळख घेण्याचें कायदेशीर महत्त्व

बँकेच्या रोजच्या व्यवहारांत बँकेचे अधिकारी व नोकर कित्येक गोष्टी करीत असतात. त्यांचें कायदेशीर महत्त्व त्यांच्या लक्षांतहि येत नाहीं. जेव्हां एकादी चूक होते व तिचेमुळें बँकेचें नुकसान होतें, तेव्हांच ह्या गोष्टींच्या महत्त्वाकडे लक्ष वेधलें जातें. इतर वेळीं ठराविक चाकोरींतून कामें चालूच असतात. बँकिंगच्या व्यवसायांतील लोकांना त्यांच्या दैनंदिन कामांतील खाचखळगे लक्षांत यावे, ह्या दृष्टीनें खालील माहिती मुद्दाम देण्यांत येत आहे.

नवीं खातीं प्रत्यहीं उघडलीं जातात. त्यांत विशेष काय आहे ? असें कांहीं बँक अधिकाऱ्यांना वाटणें शक्य आहे. बँकेच्या दुसऱ्या एकाद्या खातेदारानें किंवा दुसऱ्या बँकरनें ओळख दिली असेल, तर कांहींच अडचण नाहीं. परंतु जो दुसऱ्याची चांगली ओळख देऊं शकत नाहीं, त्याच्या बाबतींत मात्र प्रश्न उपस्थित होतो. रोख किंवा नोटा देऊन जो खातें उघडण्यास येईल त्याला ओळख नाहीं म्हणून परत धाडण्याचा खंबीरपणा स्पर्धेच्या ह्या काळांत बँक मॅनेजर किंवा एजंट दाखवीलच, असें नाहीं. ह्या नव्या खातेदाराबद्दल संशयास्पद कांहीं दिसलें नाहीं म्हणजे झालें! आणि समोरच्या दुसऱ्या बँकेनें ओळखीसाठीं ताणून न धरता हाच खातेदार लांबवला तर ? असें मॅनेजरास वाटणें स्वाभाविक आहे. बिनओळखीच्या माणसास खातें उघडूं देण्यांतील धोक्याची मॅनेजरला जाणीव असून त्यानें हा धोका जाणूनबुजून पत्करला तर गोष्ट वेगळी.

समजा, एकानें दुसऱ्याचा चेक चोरून तो बँकेंत आपल्या खात्यांत कलेक्शनसाठीं भरला. चोर हा चोरीच्या रकमेस केव्हांहि बांधलेला असतोच. परंतु कलेक्शन करणारी बँक हीहि चोराची एजंट बनते आणि चेकच्या खऱ्या मालकाची भरपाई करण्यास ती बांधलेली रहाते. लबाडी उघडकीस येण्यापूर्वींच चोर हा खात्यांत जमा झालेली रकम काढून घेऊन पसार होतो आणि खऱ्या मालकाची भरपाई करण्यास बँक मात्र शिल्लक रहाते. चोरलेला चेक क्रॉस्ड असेल आणि त्याचें कलेक्शन खातेदारासाठीं सरळ मनानें व निष्काळजीपणा न करतां केलेलें असेल तर बँकेची जबाबदारी टळूं शकते. बँकेशीं खातें असलेला कोणीहि इसम म्हणजे खातेदार. खातें उघडलें कीं तो खातेदार होतो; त्यास किती काळ झाला, हा मुद्दा गैरलागू असतो. नव्या खातेदारानें खात्यांतून पैसे काढले असण्याची किंवा पैसे काढण्याच्या शक्यतेची आवश्यकता नाहीं. तेव्हां प्रश्न येतो फक्त निष्काळजीपणाचा.

हा निष्काळजीपणा चेक कलेक्शनला येण्याचे वेळीं झाला असला पाहिजे, असें नाहीं. त्यापूर्वींचाहि निष्काळजीपणा बँकेस घातुक ठरेल. एकाद्या नव्या खातेदारानें कांहीं महिने आपलें खातें उत्तम रीतीनें चालविलें, तरी त्यानंतर त्यानें चेक चोरून, बनावट सही करून, तो चेक आपल्या खात्यांत भरणें अगदीं शक्य आहे. त्याचें खातें उघडण्याच्या वेळीं नीट ओळख बँकेनें घेतली नसेल तर निष्काळजीपणाच्या सदरांत हें कृत्य बसून बँकेला बचाव उरणार नाहीं. चोरून आणलेल्या चेकनेंच खातें उघडूं पहाणाऱ्या बिन–ओळखीच्या इसमापुरताच धोका मर्यादित नाहीं; कांहीं काळानंतरहि हा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. ह्यासाठीं (१) नव्या खातेदाराचा चांगुलपणा सिद्ध होण्यासाठीं ओळख घेणें अत्यावश्यक आहे. (२) ही ओळख तपासून पाहिली पाहिजे. तिऱ्हाइताकडून उत्तमपैकीं ओळखपत्र नव्या खातेदारानें आणलें (त्यानें तें स्वतःच लिहिलेलें असल्यानें तें उत्तम असणारच) तरी त्याचा खरेपणा बँकेनें तपासून पाहिला पाहिजे; चौकशी केली पाहिजे. (३) नव्या खातेदाराच्या हाताखालील नोकरांचीं नांवें आणि त्यांचा तपशील बँकेनें मिळवावा. नव्या खातेदारास त्याच्या नोकरीच्या निमित्तानें मालकाचे चेकबुकें हाताळण्यास मिळत असतील आणि चेकबुकें चोरण्याची संधी त्याला मिळण्याजोगी असेल, आणि बँकेनें त्याच्या मालकाचें नांव विचारलें नाहीं तर त्यांत निष्काळजीपणा झाला असें मानण्यांत येईल. ब्रोकरच्या कचेरींतील कारकुनाचे बाबतींत हें विशेषत्वानें खरें आहे. गिरणी किंवा कारखाना ह्यांतील यंत्रज्ञांचे बाबतींत गोष्ट वेगळी. ह्यासंबंधांतील चौकशी नव्या खातेदारास कदाचित् रुचणार नाहीं किंवा तो आपली नोकरीची खरी परिस्थिति बँकरला सांगणारच नाहीं; खोटीच माहिती देईल. नव्या खातेदाराची अपेक्षा अशी असते, कीं बँकरनें त्याचें विनाचौकशी स्वागत करावें. त्यामुळें तो नाखूष होऊं नये ह्यासाठीं फार खोलांत जाण्याचें बँकरहि टाळतो. हा मोह अर्थातच घातुक ठरण्याचा संभव आहे. तपशीलवार माहिती देऊन खातें उघडल्यानंतर मात्र खातेदारानें आपला धंदा, व्यवसाय, नोकरी, हीं बदल्यास त्याची खबर बँकेस देण्याची त्याचेवर जबाबदारी उरत नाहीं.

### पहिलें चेक बुक

ओळख न देता खातें उघडणाऱ्या खातेदारानें चेकबुक मागितलें, तर बँकरनें काय करावें? चेक भरून खातें उघडलें असेल तर फारशी अडचण नाहीं. हा चेक चोरून आणलेला नसेल कशावरून ? ओळखीची छाननी होईपर्यंत भरलेल्या चेकचे पोटीं पैसे काढूं न देणें क्रमप्राप्तच होतें. चेक कदाचित् पास होणार नाहीं. तेव्हां नव्या खातेदारानें थांबणें भाग आहे. परंतु, त्यानें रोख रकम भरून खातें उघडलें असलें तरीं ह्या रकमेइतके चेक काढण्याचा खातेदाराचा अधिकार आहेच, आणि तो जोपर्यंत आपल्या शिलकेपेक्षा ज्यास्त रकम काढूं पहात नाहीं तोपर्यंत बँकेस कांहींच धोका नाहीं. परंतु नव्या खात्यांत मागाहून कांहीं चेक भरले असतील आणि त्यांचे वसूल झालेले पैसे मात्र काढून घेतले जात असतील तर ओळखीची छाननी होईपर्यंत बँकरनें नजर ठेवली पाहिजे. चेकबुक घेऊन जाणारा इतरांना मोठाल्या रकमांचे चेक देत सुटला तरी ते पास होणार नाहींत (ओव्हर-ड्राफ्टची त्याला सवलत दिली नसल्यास) आणि बँकेचें त्यामुळें कांहीं नुकसान होणार नाहीं. परंतु माल देऊन हे चेक पत्करणाऱ्या तिऱ्हाईत लोकांचें मात्र बँकेविषयीं कलुषित मत होईल. म्हणून, ओळखीची छाननी होण्यापूर्वी चेकबुक द्यावयाचें किंवा नाहीं हा विचाराचा प्रश्न असतो. ह्या बाबत ठराविक नियम अर्थातच सांगतां येणार नाहीं.

अशा रीतीनें बँकर व खातेदार हें नातें निर्माण होतें. त्यांच्या व्यवहारांत कायद्याचे व इतर महत्त्वाचे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

---

रत्नागिरी येथील रेडिओ केंद्र—पोस्ट आणि टेलिग्राफ खात्याच्या बिनतारी शाखेतर्फे रत्नागिरी येथील रेडिओ केंद्र ता. १ जूनपासून सुरू करण्यांत आलें आहे. रामदास ही बोट वादळांत बुडाल्यावर जी चौकशी कमिटी नेमण्यांत आली होती, तिनें किनाऱ्यावर वहातुक करणाऱ्या बोटींना मार्गदर्शन करणाऱ्या एखाद्या रेडिओ केंद्राची आवश्यकता प्रतिपादन केली होती. त्याप्रमाणें रत्नागिरी येथील केंद्र उघडण्यांत आलें आहे असें समजतें.

### वेस्टर्न इंडियाची अखंड प्रगति

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें १९४९ साली २,४५,४७,४२८ रुपयांचे विमे दिले. त्यांच्या वार्षिक हप्त्यांची रक्कम १२,५१,०२७ रुपये होते. ह्या वर्षी आयुर्निधींत ४८,४२,३२९ रुपयांची भर पडून तो निधी ४,१५,२८,२५६ रु. झाला. कंपनीच्या जवळील रोख्यांची किंमत ताळेबंदाप्रमाणें ३,६४,४६,४४५ रु. असली तरी बाजारभावानें ती २६ लक्ष रुपये अधिक आहे. अशा रीतीनें, कंपनीची वाढत्या कामाची, सुरक्षित गुंतवणुकींची व मोठाले गुप्त रिझर्व्ह राखण्याची परंपरा प्रतिकूल परिस्थितींतहि कायम आहे. त्यामुळेंच, विमेदारांचा तिचेवरील विश्वास वाढत आहे. कंपनीनें मागील नफ्यांतून काढलेल्या डि. ई. फंडांतून १० % डिव्हिडंड भागीदारांना देण्यांत येणार आहे.

### रेडिओ सेट्सचें उत्पादन

१९४९-५० मध्यें भारतांत एकूण १६,८३८ रेडिओ सेट्स तयार झाले. सर्वांत स्वस्त झालेल्या सेटला १६१ रु. खर्च येऊन त्याच्या विक्रीचे १८५ रु. मिळाले. ड्राय बॅटरी सेटचे तेच आकडे अनुक्रमें १२८ रु. व १६२ रु. होते.

### यशस्वी सरकारी कर्ज

भारत सरकारची कर्ज उभारणी यशस्वी झाली आहे. पहिल्याच दिवशीं ३० कोटी, ३२ लक्ष रुपयांचे कर्जरोखे खपले. ७ कोटी, ५७ लक्ष रु. रोख आले आणि २२ कोटी, ७५ लक्ष रुपयांचे रोखे कनव्हर्शनसाठी आले.

### पुणें कॉर्पोरेशनची कर्ज-उभारणी

पुणें कॉर्पोरेशन ४४,३२,९०० रुपयांचें कर्ज उभारीत आहे. त्यापैकीं ३० लक्ष रुपयांच्या कर्जाचे परतफेडीस व व्याजास मुंबई सरकारनें गॅरंटी दिली आहे. हें कर्ज १९६५ सालीं परत केलें जाईल आणि ३½% दरानें व्याज मिळेल. १४,३२,९०० रुपयांचें बिन–गॅरंटीचें कर्ज १९६० सालीं परत दिलें जाईल. व्याजाचा दर ३½% राहील. गॅरंटी नाहीं, त्यामुळें जें थोडेफार वैगुण्य येईल, त्याची भरपाई करण्यासाठी परतफेडीची मुदत ५ वर्षांनीं कमी ठेवलेली दिसते.

---

**पूर्व अफ्रिकेंतील भुइमुगाची योजना**—ब्रिटनला वनस्पतीचें तेल करण्यासाठीं जो भुइमुग लागतो तो पूर्व आफ्रिकेंत पिकविण्याची एक योजना अंमलांत आणण्यांत आली होती. परंतु ह्या योजनेमुळें विशेष फायदा न होता सुमारें ३॥ कोटी पौंड खर्च मात्र झाला. ही योजना अव्यवहार्य ठरल्यामुळें मूळ योजनेपेक्षां कमी व्याप्तीची एक नवीन योजना सरकार तयार करीत आहे, असें समजतें.

**गाढवाच्या गाडीवाल्यांचें युनियन**—कराचींतील गाढवांच्या गाडीवाल्यांनीं आपला एक संघ स्थापन केला आहे. अशा गाड्यांची नोंद सरकारनें लवकर करावी अशी मागणी संघातर्फे करण्यांत आली आहे. शहरांतील २,००० खटाऱ्यांपैकीं फक्त ७०० चीच नोंदणी करण्यांत आली आहे, अशी तक्रारही संघानें केली आहे.


हा प्रॉस्पेक्टस् नसून ही शेअर विक्रीची जाहिरात आहे

# धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लिमिटेड.

( इंडियन कंपनीज ॲक्ट १९१३ अन्वयें स्थापन झालेली. )

★ उद्देश–सदर कंपनी विशेषतः देशी व आयुर्वेदीय औषधें, ॲलोपॅथिक व होमिओपॅथिक औषधें, इंजेक्शन्स, कॉस्मेटिक्स, तेलें, टॉयलेट्स, साबण इ. निर्मिति करणें याकरितां स्थापन झाली आहे.

★ वैशिष्ट्य-श्री धूतपापेश्वर पनवेल लि. हा पुराणिक घराण्याचा कारखाना आयुर्वेदीय औषधीनिर्मितींत अग्रस्थानीं आहे. गेलीं सतत ७८ वर्षे हा कारखाना औषधें निर्मितीचें कार्य करीत आहे.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

१ श्री पुरुषोत्तम बळवंत गोळे, बी. ए. एल्एल्. बी., ॲडव्होकेट, चेअरमन, अकोला ... वऱ्हाड
२ श्री. वै. गंगाधर विष्णु पुराणिक, व्यापारी व लँडलॉर्ड, अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ... पनवेल
३ वैद्यराज जादवजी त्रिकमजी आचार्य, आयुर्वेदमार्तंड, अध्यक्ष, नि. भा. वैद्य संमेलन ... मुंबई
४ श्री. वै. महादेव विष्णु पुराणिक, व्यापारी, व लँडलॉर्ड ... ... ... पनवेल
५ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, व्यापारी व लँडलॉर्ड ... ... ... ... मुंबई
६ श्री. वै. पुंडरीकाक्ष गदाधर पुराणिक, ... ... ... ... पनवेल

मॅनेजिंग अेजंटस– श्रीधूतपापेश्वर पनवेल लि., पनवेल. जि. कुलाबा, मुंबई.

अधिकृत भांडवल : : : रु. २५,००,०००
प्रथम विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल : रु. ५,००,०००
चालू विक्रीस काढलेलें भांडवल : : : रु. ५,००,०००

प्रत्येक शेअरकरितां अर्जासोबत रु. १२–८–० । प्रत्येक शेअरकरितां अर्जमंजुरीनंतर रु. १२–८–०

आणि प्रत्येक शेअरमागें राहिलेल्या रु. २५ ची भरपाई डायरेक्टर्स ठरवितील त्या हप्त्यांनीं करावयाची आहे. मात्र सदर हप्त्यांची रक्कम शेअर्सच्या नाममात्र 'नॉमिनल' रकमेच्या ¼ पेक्षां अधिक असणार नाहीं व दोन हप्त्यांमध्यें निदान दोन महिन्यांचा अवधि ठेवण्यांत येईल.

**— शेअर्सकरितां आजच अर्ज करा —**

शेअरकरितां अर्ज ठराविक फॉर्मवर करावयाचे आहेत. फॉर्म प्रॉस्पेक्टसला जोडलेले आहेत व हे अर्ज कंपनीचें रजिस्टर्ड ऑफिस, धूतपापेश्वर प्रासाद, गिरगांव रोड, मुंबई ४, यांजकडे मिळतील, त्याचप्रमाणें प्रमुख धूतपापेश्वर औषधी विक्रेते, शाखा व केंद्रें यांच्याकडे शेअरअर्जासहित प्रॉस्पेक्टस मिळण्याची व्यवस्था केली आहे.

कंपनीचें रजिस्टर्ड ऑफिस–" श्रीधूतपापेश्वर प्रासाद " गिरगांवरोड–मुंबई ४.

## The Cooperative Training College, Poona

Results of the written examination for the "Higher Diploma in Co-operation" held in April, 1950.

---

The following students are declared to have passed the final written examination for the "Higher Diploma in Co-operation" held in April 1950. The names are arranged according to the class and marks obtained.

| *Name* | *Marks Obtained* |
| --- | --- |
| **First Class** | |
| Joshi, Vishwanath Ranchhodbhai | 474 |
| Bhagwat, Deodatta Raghunath | 451 |
| Avashia, Janardhan Motilal | 447 |
| Pathan, Musakhan Shujaatkhan | 432 |
| Patel, Asabhai Gokhalbhai | 431 |
| Patel, Ishwarbhai Desaibhai | 431 |
| **Second Class** | |
| Sakhalkar, Madhukar Chintaman | 412 |
| Patel, Madhavaji Narasinh | 408 |
| *Mehendale, Prabha Madhav* | 406 |
| Jain, Misrilal | 400 |
| *Dixit Nirmala Laxman,* | 396 |
| Jhala, Sanatprasad Maniprasad | 393 |
| Patil, Shivangauda Basangauda | 392 |
| Naik, Krishnaji Vasudeo | 391 |
| Shah, Bhaichand Chunilal | 383 |
| Musti, Manjappa Ningappa | 374 |
| Shah, Hashmukhrai Shantilal | 374 |
| Kale, Bapurao Ramchandra, | 373 |
| Sonar, Sadashiv Sakharam | 372 |
| Desai, Gajendra Mukundrai | 371 |
| Patel, Ramniklal Jethabhai | 366 |
| Sompura, Mohanlal Dosaji | 363 |
| Kapoor, Ghanshyam Lal | 361 |
| Sathe, Bhagwan Vishnu | 360 |
| Shikarkhane, Balkrishna Laxman | 357 |
| *Bhide, Tilottama George* | 355 |
| **Pass Class** | |
| Sutavane, Ramchandra Keshav | 349 |
| Patwardhan, Madhav Ramchandra | 345 |
| Premnath Mahendra | 340 |
| Udhas, Kanjibhai Dosabhai | 338 |
| Joshi, Shankerlal Narsinh | 333 |
| Pandya, Sureshchandra Kirpashankar | 333 |
| Hallikeri, Neelakanth Chanbassappa | 332 |
| Savant, Laxman Shankerrao | 330 |
| Mehta, Raghuvir Satvantlal | 330 |
| Chittal, Ramkrishna Pandurang | 326 |
| Patel, Kashibhai Haribhai | 320 |
| Desai, Ramlal Ranchhodji | 312 |

**D. A. Shah,**

Poona,
20th June, 1950.

Principal and Secretary,
Co-operative Training
College, Poona.

DR. WAMAN GOPAL'S
SARSAPARILLA

**पॉवर अल्कोहलचें उत्पादन**–भारतांत पॉवर अल्कोहलचें उत्पादन करणारे १४ कारखाने असून त्यांतून दर महिना ७,६१,९६६ गॅलन पॉवर अल्कोहल तयार होऊं शकेल. ३१ मार्च, १९५० अखेर संपणाऱ्या तिमाहींत १४,९७,०६८ अल्कोहल तयार होईल असा अंदाज करण्यांत आला होता. तो खरा ठरल्यास डिसेंबर १९४९ अखेर पुऱ्या झालेल्या तिमाहींतील उत्पादनापेक्षा ३० टक्के अधिक उत्पादन झालें असें म्हणतां येईल.

**तांदुळाचा आहार आणि जननसंख्या**–जपानमधील लोकांच्या आहारांत तांदूळ अधिक प्रमाणांत असल्यामुळें जपानी लोकांचें दर हजारीं जननसंख्येचें प्रमाण फार मोठें आहे, असें एका जपानी डॉक्टरांचें म्हणणें आहे. तांदुळांत असणाऱ्या ॲसिडमुळें स्त्री आणि पुरुष ह्या दोघांचीही जननक्षमता वाढते असें त्यांचें मत आहे. कॅनडांतही ह्यासंबंधीं प्रयोग चालू आहेत.

**संयुक्त प्रांतांतील प्राथमिक शिक्षण**—पुढील शैक्षणिक वर्षांत संयुक्त प्रांताच्या शहरांतील, ६ ते ११ वर्षांचीं सर्व मुलें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कक्षेंत येतील. गेल्या दोन वर्षांत प्रांतांतील ६,७०० बेसिक प्राथमिक शाळांतून ३,००,००० मुलांना शिक्षण देण्यांत आलें.

**तुटीच्या राज्यांना अनपेक्षित मदत**—पंजाब व पतिआळा संघराज्यांत अन्नधान्याची अपेक्षेपेक्षां अधिक वसुली झाली आहे. संघराज्याच्या सरकारनें तुटीच्या प्रांतांना ठरल्यापेक्षा २५ हजार टन आटा आणि गहूं जास्त देण्याचें कबूल केलें आहे.

---

## Cooperation And Accountancy Diploma Board

The undermentioned candidates have been declared by the Cooperative and Accountancy Diploma Board to have passed the Government Diploma in Co-operation and Accountancy Examination held in April 1950 at Poona:—

**Passed The Whole Examination**

**Second Class**

Deshpande R. B., Karvade H. G.

**Pass Class**

Bidarhalli K. V., Dongre S. N., Kulkarni A. K., Parandkar S. N., Sheikh M. B., Torke S. V., Bulla S. T., Dave A. D., Hadadgi M. T., Kadapa S. N., Patel A. G., Patel I. D., Patel R. J., Rangangawdar R. R., Joshi V. R.

**Passed In Accountancy Group Only**

Bapat A. K., Karnataki P. L., Kulkarni V. R. Makhijani C. G., Patki M. D., Savant N. D., Tarakannavar R. C., Bhatt G. G., Chaudhari G. M., Deshpande K. L., Gayal V. V. Hudalikar B. N., Jadhav M. R., Joshi M. K., Joshi V. V., Kalaskar S. R., Kirpalani R. R., Kulkarni H. M., Kulkarni N. B., Naik H. B., Patil K. N., Samant M. R., Savant G. Y., Shaikh F. M., Thombre S. V., Vantmuri S. V., Waghmare A. H.

**Passed In Cooperation Group Only**

Hiremath C. R., Bhujang M. V., Dhumal S. Y., Panchwadkar P. N., Ponde U. B., Walambe S. G., Walwekar R. R.

**P. J. Chinmulgund,**

Registrar of Cooperative Societies and Chairman of Cooperation and Accountancy Board, Poona.

## भारताचें राष्ट्रीय उत्पन्न

१९४५-४६ सालीं दरडोई राष्ट्रीय उत्पन्न २०४ रुपये होतें, तें १९४६-४७ सालीं २२८ रुपयांपर्यंत वाढलें. त्याबरोबरच वस्तूंच्या किंमतींच्या सर्वसाधारण प्रमाणांत १२·५ टक्क्यांनीं वाढ झाली आहे. १९४६-४७ सालीं एकूण राष्ट्रीय उत्पन्न ५,५८० कोटी रुपयांचें झालें. हा आंकडा फाळणीनंतरच्या भारतांतील सर्व प्रांतांना लागू असून त्यांत मागाहून विलीन झालेल्या संस्थानांचा समावेश झालेला नाहीं. शेती, पशुपालन, जंगलें आणि खाणकाम या क्षेत्रांत १९४५-४६ सालीं २,००९ कोटी रुपये उत्पन्न झालें होतें. त्यांत १९४६-४७ सालीं बरीच वाढ होऊन तें २,३९८ कोटी रुपये झालें. एकट्या शेतींत १,७७० कोटी रुपये उत्पन्न आलें. मागील वर्षी हाच आंकडा १,४९५ कोटी रुपये होता. नागरी विभागांतील काम करणाऱ्या १ कोटी, ८८ लक्ष लोकवस्तीचें उत्पन्न २,१०७ कोटी रुपये झालें आणि ग्रामीण विभागांतील काम करणाऱ्या ८ कोटी, ७१ लक्ष लोकवस्तीचें उत्पन्न ३,४८३ कोटी रुपये भरलें. अशा रीतीनें नागरी आणि ग्रामीण विभागांतील काम करणाऱ्या लोकवस्तीपैकीं प्रत्येक व्यक्तीनें १९४६-४७ सालीं अनुक्रमें १,१२१ आणि ४०१ रुपये उत्पन्न मिळविलें असें दिसून येतें. १९४८-४९ सालच्या तात्पुरत्या अंदाजाप्रमाणें त्या वर्षी एकूण राष्ट्रीय उत्पन्न ६,९९८ कोटी रुपये आणि दरडोई उत्पन्न २७२ रुपये निघालें असें समजतें.

---

### हायर डिप्लोमा इन कोऑपरेशन परीक्षेचा निकाल

एप्रिल मध्यें झालेल्या वरील डिप्लोमा परीक्षेस ५९ विद्यार्थी बसले होते, त्यांपैकीं ३८ पास झाले. म्हणजे, पासांचें प्रमाण ६४·४ % पडलें. पास झालेल्यांचे नंबर गुणानुक्रमें खालीं दिले आहेत.

पहिला वर्गः—नंबर. ९, १, ५३, १८, १५ आणि ३७.

दुसरा वर्गः— २१, ३९, ५६, ४५, ५, ३०, १९, ३४ ४९, १३, ५०, १०, २५, ३, १७, ६१, ४४, ४१, २३ आणि ५४.

पास वर्गः— ४२, ५९, ४७, ४३, ३१, ३६, ८, २२, ५७, २, ३८ आणि ५५.

---

**सोव्हिएट रशियाचें अंदाजपत्रक**—सोव्हिएट रशियाच्या १९५० च्या अंदाजपत्रकांत ४३,२०० कोटी रुबल्स उत्पन्न दाखविण्यांत आलें असून ४२,७९० कोटी रुबल्स खर्च दाखविण्यांत आला आहे. एकूण उत्पन्नापैकीं १८·५ टक्के रक्कम संरक्षणासाठी खर्च व्हावयाची आहे. १९४९ सालीं सोव्हिएट रशिआचें औद्योगिक उत्पादन १९४८ च्या मानानें २० टक्के वाढलें, असें अंदाजपत्रक सादर करतांना सांगण्यांत आलें.

**तांत्रिक मदतीसाठी निधी**—मागासलेल्या राष्ट्रांच्या तांत्रिक मदतीसाठी एक निधी उभारला जात आहे. या निधीला भारतानें २,५०,००० डॉलर्सची मदत दिली. चीननें १०,००० डॉलर्स दिले, सीलोननें १५,००० डॉलर्स दिले, ब्रह्मदेशानें ७,५०० दिले, अफगाणिस्थाननें ७,००० दिले आणि इंडोनेशिआनें १,२२,००० दिले.

**ब्रिटनची मदत**—मागासलेल्या राष्ट्रांना मदत देण्यासाठीं ब्रिटननें ७,५०,००० पौंड देण्याची आपली तयारी संयुक्त राष्ट्रसंघाला कळविली आहे.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

जास्त माहितीसाठी मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरीः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखाः—(१) भवानी पेठ. (२) सदाशिव पेठ.

बाहेरगांवच्या शाखाः— (१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

### कपाशीचें उत्पादन वाढविण्यासाठी सूट व सवलती

मुंबई राज्यांत कपाशीचें उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनें मुंबई सरकारनें कपाशीच्या लागवडीसंबंधीं घातलेले सर्व निर्बंध काढून टाकण्याचें ठरविलें आहे. आतां शेतकऱ्यांना आपल्या शेतांत वाटेल तितक्या जमिनींत कपाशीची लागवड करतां येईल. मुंबई सरकारनें कपाशीच्या लागवडीसाठीं पाणी पुरवठ्याच्या बाबतींत अधिक सवलती देण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें, सरकारनें कपाशीची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना या पिकास घालण्यासाठीं एकूण १५,००० टन अमोनियम सल्फेट स्वस्त दरानें पुरविण्याचें ठरविलें आहे. ऊंस व अन्नपिकांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना टनामागें जो दर आकारला जातो त्यापेक्षां हा दर ४० रुपयांनीं कमी असेल.

शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूनें जेवढी जादा जमीन कपाशीच्या लागवडीखालीं आणली जाईल त्या जमिनीच्या बाबतींत संपूर्णतया सारासूट देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. मात्र यांत पाणीपट्टीचा अंतर्भाव होत नाहीं. याचबरोबर मुंबई राज्याचें धान्योत्पादन वाढीसंबंधीचें ध्येय साध्य करण्याच्या कामीं सरकारकडून कोणत्याही प्रकारें कसूर होणार नाहीं.

---

### रशियांतील राजकीय कैद्यांच्या अवस्थेचें अमेरिकेंत प्रात्यक्षिक

रशियांतील युद्धकैद्यांच्या छावण्यांतून निसटून आलेल्या सुमारें १०० "गुलामां"नीं न्यूयॉर्क येथें "असोसिएशन ऑफ फॉर्मर प्रिझनर्स ऑफ सोव्हिएट लेबर कॅम्प्स" संस्था स्थापन केली आहे. ह्या लेबर कँपमध्यें पूर्वी असणारांनाच संस्थेचे सभासद होतां येतें. सुटून आलेल्या रशियन "गुलामां"ना मदत करणें आणि रशियांतील गुलामगिरीबद्दल प्रसिद्धी देणें हा ह्या संस्थेचा उद्देश आहे. रशियांत असलेल्या सुमारें १,२०,००,००० राजकीय कैद्यांची दुरवस्था प्रत्यक्ष दाखविण्यासाठीं एका कँपाचा नमुना तयार करणें आणि अमेरिकन लोकांना तेथील स्थितीची कल्पना आणून देणें, हींहि कामें ही संस्था करणार आहे. "न्यूजवीक"नें ही माहिती दिली आहे.

---

**तगाई कर्जे कमी मिळणार**—सध्याची आर्थिक परिस्थिती व उदारपणें तगाई कर्जे दिल्याचा सहकारी चळवळीवरील कांहीं अंशीं अनिष्ट परिणाम, ह्यांचा विचार करून यापुढें सुखवस्तू इसमांना तगाई कर्जे दिलीं जाणार नाहींत; तीं फक्त गरीब शेतकऱ्यांनाच देण्यांत येतील. चालू आर्थिक सालांत ॲग्रिकल्चरिस्टस् लोन्स ॲक्टखालीं २,००० रुपयांपेक्षां जादा रकमेचें आणि लॅण्ड इम्प्रूव्हमेंट लोन्स ॲक्टखालीं ५,००० रुपयांपेक्षां जादा रकमेचें तगाई कर्ज जिल्ह्याच्या कलेक्टरांना मंजूर करतां येणार नाहीं. ५,००० रुपयांपेक्षां जादा रकमेचें कर्ज कोणत्याही परिस्थितींत मंजूर केलें जाणार नाहीं.

तसेंच तगाई मॅन्युअलमध्यें तगाई कर्जाची फेड करण्याची ठरवून दिलेली मुदत (२० वर्षे) फार दीर्घ आहे असें सरकारला वाटतें. तेव्हां या बाबतींत हुकूम निघेपर्यंत ही मुदत कोणत्याहि परिस्थितींत १० वर्षांपेक्षां अधिक असूं नये असा सरकारनें आदेश दिला आहे. ज्या बाबतींत आधींच कर्जफेडीची मुदत कमी ठरवून दिलेली आहे ती या पुढेंहि चालू राहील.


बेडेकर पापड वापरा

**दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)**

पुणें शाखा:-९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**


—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.